माहे ऑक्टोबर-२०१८ ते फेब्रुवारी-२०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी तसेच सरपंच पदासाठी थेट निवडणुकीद्वारे भरण्यात येणाऱ्या रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम. (२८ जिल्हे)

निवडणूक तात्काळ
ई-मेलव्दारे

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१७/का-८
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २३/०८/२०१८

प्रति,
जिल्हाधिकारी (२८ जिल्हे).

**विषय :- माहे ऑक्टोबर-२०१८ ते फेब्रुवारी-२०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी तसेच सरपंच पदासाठी थेट निवडणुकीद्वारे भरण्यात येणाऱ्या रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.**

महोदय/महोदया,

राज्यातील माहे ऑक्टोबर-२०१८ ते फेब्रुवारी-२०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी तसेच सरपंच पदासाठी थेट निवडणुकीद्वारे भरण्यात येणाऱ्या रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी खालील प्रमाणे आदेश आयोगाकडून आतापर्यंत निर्गमित करण्यात आलेले आहेत :

(i) **प्रभाग रचना** - क्रमांक : रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.११/का-८, दिनांक २२/०५/१८ प्रभाग रचना व आरक्षण - ही कार्यवाही दिनांक ०९/०८/२०१८ रोजी पूर्ण झाली आहे.

(ii) **मतदार यादी कार्यक्रम** - क्रमांक : रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१२/का-८, दिनांक २५/०७/२०१८ रोजीच्या आदेशानुसार संगणकीकृत पध्दतीने अंतिम मतदार यादी दिनांक २४/०८/२०१८ रोजी मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

(iii) **निवडणूक पूर्वतयारी** - क्रमांक : रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१६/का-८, दिनांक १८/०८/२०१८ रोजी या निवडणुकांसाठी निवडणूक पूर्वतयारीचे सविस्तर आदेश.

(iv) महाराष्ट्र शासन अधिनियम क्र.५४/२०१८ अन्वये दिनांक १३/०८/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे ग्रामपंचायत अधिनियमातील सुधारणा.

२. आता प्रत्यक्ष निवडणूकीच्या कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आ दे श

२.१ परिशिष्ट-ब व क मध्ये दर्शविलेल्या अनुक्रमे सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार निवडणुका घेण्यात याव्यात.

२.२ माहे ऑक्टोबर-२०१८ ते फेब्रुवारी-२०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने अस्तित्वात आलेल्या सुमारे १०४१ ग्रामपंचायतींच्या जिल्हानिहाय तपशील परिशिष्ट-ब मध्ये व सरपंच पदासाठी थेट निवडणुकीद्वारे भरण्यात येणाऱ्या रिक्त पदांबाबत जिल्हानिहाय सुमारे ६९ ग्रामपंचायतींचा तपशील परिशिष्ट-क मध्ये दर्शविण्यात आले आहेत.

२.३ निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये (सुमारे १०४१+६९) निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील. या क्षेत्रातील मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा मंत्री, खासदार, आमदार व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकाऱ्यांना आचारसंहिता कालावधीत कुठेही करता येणार नाही.

२.४ या निवडणुकांसाठी नामनिर्देशनाची प्रक्रिया संगणक प्रणालीद्वारेच राबविण्यात यावी.

२.५ सोबतच्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे फक्त गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांकरीता मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते दुपारी ३.०० अशी राहील व इतर सर्व संबंधित जिल्ह्यांत मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल.

२.६ निवडणूक कार्यक्रम सुरू झाल्यानंतर एखाद्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक व सरपंच पदाच्या पोट निवडणुकीसंदर्भात न्यायालयाचे किंवा विभागीय आयुक्त (अपिलासंदर्भात) यांच्या स्तरावरून देण्यात आलेले स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास त्याबाबत आपल्या स्तरावर लगेच कार्यवाही करुन त्याप्रमाणे आयोगास तात्काळ सूचित करावे. याबाबतची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असेल.

२.७ ग्रामपंचायतींची निवडणुक प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शी पद्धतीने पार पाडण्याच्या दृष्टीने आयोगाकडून दिनांक १८/०८/२०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या पूर्वतयारी आदेशातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

२.८ नवीनतम उपक्रम राबविण्यासंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

३. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| संकेतस्थळ | www.mahasec.maharashtra.gov.in |
| दूरध्वनी कमांक (ग्रा. पं. शाखा) | ०२२-२२८४६७२० |
| दूरध्वनी क्रमांक (संगणकीकरण शाखा) | ०२२-२२८८६९५० |
| ई-मेल ॲड्रेस | sec.mh@gov.in |

सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार,

आपली,

(र. ध. बेले)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**सोबत- परिशिष्टे - अ, ब आणि क**

प्रत : १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, वित्त विभाग तसेच सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

४. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५. **प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**यांना कळविण्यात येत आहे की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करून त्यांना तात्काळ उपलब्ध करून द्यावे.**

६. विभागीय आयुक्त (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी.

७. **संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४.**
**यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहीत वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.**

८. पोलीस महानिरीक्षक (सर्व संबंधित), महाराष्ट्र राज्य.

९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व संबंधित).

१०. जिल्हा पोलिस अधिक्षक (सर्व संबंधित).

११. प्रभारी उपायुक्त, संगणकीकरण शाखा, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांना **मतदान साहित्य विषयक** कार्यवाहीसाठी.

१२. तहसिलदार, संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांना **निवडणुकीच्या ऑनलाईन प्रक्रिये विषयक** कार्यवाहीसाठी.

१३. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, यांना **निवडणूक कार्यक्रमाच्या प्रसिध्दी विषयक** कार्यवाहीसाठी.

१४. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र सर्व कार्यासने.

१५. निवड नस्ती (२ प्रती).

*(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१७/का-८, दि.२३/०८/२०१८ च्या पत्रासोबतचे सहपत्र)*

परिशिष्ट - अ

राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेला माहे ऑक्टोबर-२०१८ ते फेब्रुवारी-२०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक तसेच सरपंच पदासाठी थेट निवडणुकीद्वारे भरण्यात येणाऱ्या रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.२७/०८/२०१८ (सोमवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.०५/०९/२०१८ (बुधवार) ते दि.११/०९/२०१८ (मंगळवार) वेळ स. ११.०० ते दु. ३.०० *(रविवार दि. ०९/०९/२०१८ हा सार्वजनिक सुट्टीचा दिवस वगळून)* |
| ३ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१२/०९/२०१८ (बुधवार) वेळ स. ११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१५/०९/२०१८ (शनिवार) दु. ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दि.१५/०९/२०१८ (शनिवार) दु. ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि.२६/०९/२०१८ (बुधवार) स.७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा. पर्यंत (गडचिरोली जिल्ह्यासाठी स.७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत) |
| ७ | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील.) | दि.२७/०९/२०१८ (गुरुवार) |
| ८ | जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दि.२९/०९/२०१८ (शनिवार) |

मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशाप्रमाणे,

रधबेले

(र. ध. बेले)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

*(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१७/का-८, दि.२३/०८/२०१८ च्या पत्रासोबतचे सहपत्र)*

## परिशिष्ट - ब

### माहे ऑक्टोबर-२०१८ ते फेब्रुवारी-२०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या, सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींचा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार जिल्हानिहाय तपशिल.

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या |
|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे | ०६ |
| २ | | रायगड | १२१ |
| ३ | | रत्नागिरी | १९ |
| ४ | | सिंधुदुर्ग | ०४ |
| | कोकण विभाग एकूण | | १५० |
| ५ | नाशिक | नाशिक | २४ |
| ६ | | धुळे | ८३ |
| ७ | | जळगांव | ०६ |
| ८ | | अहमदनगर | ७० |
| ९ | | नंदुरबार | ६६ |
| | नाशिक विभाग एकूण | | २४९ |
| १० | पुणे | पुणे | ५९ |
| ११ | | सोलापूर | ६१ |
| १२ | | सातारा | ४९ |
| १३ | | सांगली | ०३ |
| १४ | | कोल्हापूर | १८ |
| | पुणे विभाग एकूण | | १९० |
| १५ | औरंगाबाद | बीड | ०२ |
| १६ | | नांदेड | १३ |
| १७ | | उस्मानाबाद | ०४ |
| १८ | | लातूर | ०३ |
| | औरंगाबाद विभाग एकूण | | २२ |
| १९ | अमरावती | अकोला | ०३ |
| २० | | यवतमाळ | ०३ |
| २१ | | बुलडाणा | ०३ |
| | अमरावती विभाग एकूण | | ०९ |
| २२ | नागपूर | नागपूर | ३८१ |
| २३ | | वर्धा | १५ |
| २४ | | चंद्रपूर | १५ |
| २५ | | भंडारा | ०५ |
| २६ | | गडचिरोली | ०५ |
| | नागपूर विभाग एकूण | | ४२१ |
| | **एकूण** | | १०४१ |

*(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१७/का-८, दि.२३/०८/२०१८ च्या पत्रासोबतचे सहपत्र)*

परिशिष्ट – क

सरपंच पदासाठी थेट निवडणुकीद्वारे भरण्यात येणाऱ्या रिक्त पदांच्या पोट निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींचा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार जिल्हानिहाय तपशिल.

| अ.क्र. | जिल्ह्यांचे नाव | सरपंच पद रिक्त असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या |
|---|---|---|
| १ | ठाणे | ०४ |
| २ | रायगड | ०३ |
| ३ | सिधुदुर्ग | ०१ |
| ४ | नाशिक | ०८ |
| ५ | धुळे | ०२ |
| ६ | जळगाव | ०१ |
| ७ | पुणे | ०६ |
| ८ | सातारा | ०३ |
| ९ | सांगली | १० |
| १० | उस्मानाबाद | ०१ |
| ११ | जालना | ०२ |
| १२ | यवतमाळ | ०३ |
| १३ | वाशिम | ०६ |
| १४ | बुलडाणा | ०२ |
| १५ | नागपूर | ०१ |
| १६ | चंद्रपूर | ०२ |
| १७ | गडचिरोली | १४ |
| **एकूण** | | **६९** |